सकाळ

# सायबर सुरक्षाबाबत कार्यशाळा संपन्न

**अकोट, ता. ५ :** स्थानिक शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सुरक्षेबाबत कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी सुमित सपकाळ व अनिकेत भुडके या सायबर वॉरियर्सनी ऑनलाइन फसवणूक, फेसबुक अकाउंट हॅक कसे केले जाते, फेक वेबसाईटस कशा ओळखाव्या या विषयी मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा क्विक हिल फाउंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर यांच्या सहयोगाने व प्राचार्य डॉ. जगदीश साबू आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. कार्यशाळेचे अध्यक्ष मुख्याध्यापक वालसिंगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षिका अंजली सपकाळ, शिक्षक श्री. चौधरी, श्री.हिंगणकर व सर्व शाळेचे विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

Akola, Akola-Today
06/08/2024 Page No. 3